नि.दि.दा.क्र. ११२/२०१८
नि.क्र.१७०

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१, ११ व १२ करिता विधीज्ञ श्री. एस.एस. चौधरी यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>

९. हे म्हणणे खरे आहे की, मौजे मातुलठाण येथील गट नं.१३४, क्षेत्र १ हे. ४१ आर ही जमीन माझ्या वडीलांनी माझ्या नावावर खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, भूविकास बँकेचे कर्ज फेडण्याकरीता माझ्या वडीलांनी माझ्या सास-याला आर्थिक मदत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या आर्थिक मदतीपोटी माझ्या सास-याने सदर जमीन मला विक्री केल्यामुळे ही माझी स्वतंत्र मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ सोबत माझे लग्न झाले हे दाखविण्याकरीता माझ्याकडे पुरावा आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.३ करिता विधीज्ञ श्री. सिंग यांनी प्रतिवादी क्र.१, ११ व १२ यांनी घेतलेला उलटतपास अंगीकृत केला.</u>

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.४ ते १० करिता विधीज्ञ श्री. वाबळे यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>

१०. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हे माझे पती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे मातुलठाण येथील गट नं.१३४, क्षेत्र १ हे. ४१ आर ही जमीन माझे सासरे मुरलीधर व माझे पती प्रतिवादी क्र.१ या दोघांनी मला विक्री केली. मी खरेदी केलेले क्षेत्र हे प्रतिवादी क्र.१ यांच्या हिश्याचे होते, याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौजे मातुलठाण येथील गट नं.१३४, क्षेत्र १ हे. ४१ आर या जमिनीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.४ ते १० यांना हिस्सा मिळू नये म्हणून मी खोटी कैफियत व पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, मौजे मातुलठाण येथील गट नं.१३४, क्षेत्र १ हे. ४१ आर ही जमीन मी माझी मुलगी पद्मा हिच्या नावे केली.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१५ करीता विधिज्ञ श्री. होले यांनी नाकारला.</u>

<u>वादींकरीता उलटतपासासाठी तहकूब.</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.08.20 17:12:06 +0530

(आशिष बि. मरलेचा)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २०/०८/२०२५